# मायांग बाहेर येणे : कारणे व उपाय

**डॉ. महेशकुमार इंगवले**
पशुजनन, मादीरोग व प्रसुतीशास्त्र विभाग
स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशु विज्ञान संस्था, अकोला.

गाभण काळात, गर्भाशयावर ताण पडून किंवा प्रसुतीच्या तृतीय अवस्थेत गर्भाशय शरीराची नेहमीचा जागा सोडून योनीच्या बाहेर येते अशा स्थितीला मायांग बाहेर येणे असे म्हणतात. हा प्रकार गाई विण्याअगोदर, विताना व विल्यानंतर दिसुन येतो.

**कारणे :**

१. गर्भाशयाला आधार देणारे स्नायु अशक्त झाल्यास.

२. संप्रेरकाचा अभाव.

३. कॅल्शीयम व फॉस्फरस या क्षाराची कमतरता.

४. गर्भाशयाचा संसर्ग.

५. वार अडकल्यानंतर.

६. वासरु अडल्या अवस्थेत गायीच्या जोरदार कळामुळे.



**गाईमधील बाहेर आलेले मायांग**

**लक्षणे :**

१. योनीमार्गातून तांबुस फुग्यासारखे गर्भाशय बाहेर येते.

२. बाहय वातावरणातील हवेमुळे किंवा जमीनीशी घर्षण झाल्याने हा फुगा सुजला जातो व त्याचा आकार वाजवीपेक्षा मोठा झाल्याचा दिसतो.

३. बाहेर आलेल्या गर्भाशयास जखमा होऊन रक्तस्त्राव सुरु होतो.

४. गाय कळा देते व अस्वस्थ राहते.

५. गाईला लघवी करतांना त्रास होतो.

**प्रतिबंधक उपाय :**

१. गाय विण्यापुर्वी २-३ महिने समतोल व सकस आहार द्यावा.

२. मायांग बाहेर पडण्याची शक्यता असल्यास, गाईची पाठीमागील बाजु चढावर व पुढील पायाची बाजु उतारावर राहिल अशा पध्दतीने गाईला बांधावे.

३. वासरु जर अडले असेल तर ओढून काढतांना अनावश्यक जोर लावू नका.

४. अडकलेला वार बाहेर पडण्यासाठी जड वस्तु बांधु नये.

**उपचार :**

१. मायांग बाहेर आल्यानंतर प्राथमीक उपचार म्हणुन पशुपालकांनी बाहेर आलेला भाग स्वच्छ पाण्याने धुवुन घ्यावा.

२. बाहेर आलेल्या भागास बर्फाने शेकावे तसेच साखरेचे चिकट द्रावण करुन त्यावर लावावे.

३. पुढील उपचार पशुवैद्यकाकडुन लवकरात लवकर करुन घ्यावे.